www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



तबलावादक झाकीर हुसेन काळाच्या पडद्याआड

पान ४ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




एमएसपी दराने धान विकण्यासाठी नोंदणी मुदत ३१ डिसेंबर

पान ५ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### ‘बेस्ट’ बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानपरिषदेत नियम २८९ अन्वये विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. श्री. फडणवीस म्हणाले की, ‘बेस्ट’ बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस ‘बेस्ट’च्या ताफ्यात येणार आहेत.

### बीड येथील घटना गंभीर; प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



नागपूर : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २८९ अन्वये उपस्थित केलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी ‘सीआयडी’ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल.

डोंबिवली, ठाणे आणि भाईंदर शहरांना जोडणाऱ्या

# जलवाहतुकीच्या कामांना गती द्या - खासदार नरेश म्हस्के



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी डोंबिवली, ठाणे आणि भाईंदरला जोडणाऱ्या मुंबईतील जलवाहतुकीच्या ) संदर्भात संसदेत नियम ३७७ अन्वये अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने (एमएमबी) अंतर्देशीय प्रवासी जलवाहतूक प्रणालीच्या अंमलबजावणीद्वारे मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) दुर्गम नागरी भागांना जोडण्याची योजना आखली आहे. भाईंदर, कोलशेत, काल्हेर आणि डोंबिवली येथे चार जेट्टी बांधून सुरुवातीला मिरा-भाईंदर, ठाणे, भिवंडी आणि डोंबिवली शहरे जलवाहतुकीद्वारे जोडली जाणार आहेत. पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटीसाठी वसई खाडी - उल्हास नदीवर प्रवासी जलवाहतूक चालविली जाईल, जी लोकसंख्या आणि रहिवासी क्षेत्राच्या विस्तारासह एमएमआरमध्ये विकसित केलेल्या प्रवासाच्या पद्धतींना पूरक ठरेल, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी सभागृहात दिली. पान २ वर

## हिवाळी अधिवेशनात ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

● नागपूर, सचिन कदम :



लाडक्या बहिणींसाठी १ हजार ४०० कोटी

विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला भरभरून मतदान करणाऱ्या लाडक्या बहिणींना देवाभाऊंनी (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) पहिल्याच अधिवेशनात विशेष भेट देऊ केली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवार, दि. १६ डिसेंबर रोजी तब्बल ३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. त्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेसाठी ३ हजार १५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना महायुती सरकारने जुलै महिन्यातील अधिवेशनात विक्रमी ९४ हजार कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या होत्या. पान २ वर

# मुंबईत भाजपचेच पालकमंत्री?

## शिंदेसेनेचाही पदावर दावा

● मुंबई, विशाल पाटील :



राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी झाल्यानंतर अखेर मुंबईला भाजपचेच पालकमंत्री मिळणार, हे जवळपास स्पष्ट झाले आहे. नव्या मंत्रिमंडळात मुंबईतील दोन मंत्र्यांचा समावेश झाला आहे. दोघेही भाजपचे दिग्गज नेते आहेत. आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता शिंदेसेनेकडून मुंबई शहरचे पालकमंत्रीपद पुन्हा घेण्याचा प्रयत्न असला, तरी मुंबईतून शिंदेसेनेचा एकही आमदार मंत्रिमंडळात नाही.

राज्य सरकारच्या नव्या मंत्रिमंडळात मुंबईतील भाजपचे मंगल प्रभात लोढा आणि आशिष शेलार या दोन आमदारांचा मंत्री म्हणून समावेश करण्यात आला आहे. यापैकी मंगल प्रभात लोढा हे सातव्यांदा मलबार हिलमधून, तर आशिष शेलार हे तिसऱ्यांदा वांद्रे मतदारसंघातून आमदार झाले आहेत. या दोघांनीही यापूर्वी मंत्रिपद भूषविले आहे. आता ते पुन्हा मंत्रिपदाची धुरा सांभाळत असताना पालकमंत्री पदाची चर्चा सुरू झाली आहे. पान २ वर

> गेल्या मंत्रिमंडळामध्ये मुंबई शहरचे पालकमंत्री म्हणून दीपक केसरकर यांनी अतिशय उत्तम काम पाहिले आहे. त्यामुळे मुंबई शहराच्या पालकमंत्री पदावर आमचा दावा कायम आहे. मंत्रिमंडळात मुंबईचा चेहरा नसला तरी यावेळीसुद्धा आमचा कोणताही सक्षम मंत्री मुंबईच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारू शकतो. त्यामुळे या पदावर आमचा दावा कायम आहे आणि आम्ही तो मिळवणारच.
>
> - डॉ. राजू वाघमारे, सहमुख्य प्रवक्ते, शिंदेसेना

# आता राज्यसभेवर जाणार नाही - छगन भुजबळ

● नाशिक, शकील शेख :



मंत्रीपद न मिळाल्याने नाराज असलेल्या छगन भुजबळांना राज्यसभेत पाठवले जाणार, अशी चर्चा सुरु झाली आहे. मात्र आपण राज्यसभेवर जाणार नाही, असे भुजबळांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे. “आता राज्यसभेवर जाणं म्हणजे मतदारसंघातील मतदारांशी प्रतारणा केल्यासारखं होईल”, असं भुजबळ म्हणाले आहेत.

यावेळी बोलताना भुजबळ यांनी म्हटलं की, ७-८ दिवसांपूर्वी मला राज्यसभेवर जा, असं पक्षाकडून सांगण्यात आले. मी पूर्वी राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छुक होतो. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर आता मी राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छुक नाही, असं मी पक्षाला स्पष्टपणे कळवलं आहे. मला माझ्या मतदारसंघातील मतदारांनी निवडून दिलं आहे. मग आता मी जर राज्यसभेवर गेलो, तर ती माझ्या मतदारांची प्रतारणा ठरेल, असं वक्तव्य छगन भुजबळ यांनी केले आहे. लोकसभेच्या वेळी देखील भुजबळ यांची निवडणूक लढवण्याची इच्छा होती. मात्र त्यावेळी पक्षाकडून त्यांना संधी मिळाली नाही. पान २ वर

# एसटीला नोव्हेंबर मध्ये ९४१ कोटी रुपये इतके विक्रमी उत्पन्न

## प्रतिदिन सरासरी ६० लाख प्रवाशांची वाहतूक...

● मुंबई, यश सावंत :




दिवाळी सणाच्या निमित्ताने प्रवाशांचा चढ-उतार वाढल्यामुळे तब्बल ९४१ कोटी रुपये इतके यंदाच्या वर्षातील सर्वाधिक उत्पन्न नोव्हेंबर महिन्यात एसटी महामंडळाला मिळाले आहे. या महिन्यात एसटीने दररोज सरासरी ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून सुमारे ३१.३६ कोटी रुपये उत्पन्न प्रतिदीन प्राप्त केले आहे. मागील वर्षाच्या याच काळातील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न सुमारे २६ कोटी रुपयांनी जास्त आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी दिवाळीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात आली होती. यंदा ही भाडेवाढ नसतांना देखील वाढलेले विक्रमी उत्पन्न हे एसटीवर सर्वसामान्य प्रवाशांनी दाखवलेले विश्वासाचे द्योतक आहे, असे प्रतिपादन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.

एसटीचे प्रवासी उत्पन्न जरी वाढलेले असले तरी, त्याप्रमाणामध्ये एसटीचा खर्च देखील वाढलेला आहे. पान २ वर

# बीड व परभणीत घडलेल्या घटना संतापजनक, जनतेत तीव्र संताप, सरकारने उत्तर द्यावे: नाना पटोले

■ परभणीतील सोमनाथ सुर्यवंशींचा मृत्यू कोठडीतील मारहाणीमुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट, सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल करा.

■ माजी मंत्री रविंद्र चव्हाणांच्या बंगल्यावर ९ कोटी रुपयांच्या वसुलीसाठी तरुणाला किडनॅप करून अत्याचार.

■ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधीपक्ष आक्रमक, ईव्हीएम व बीड, परभणीतील मुद्द्यांवर विधानभवनच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी.



● नागपूर, नितीन देवळेकर :

नागपूर - अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीड मधील घटनांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निघृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. पान २ वर

# राज्यात साडेदहा हजारांहून अधिक व्यापगत गृहप्रकल्पांवर 'महारेरा' करणार कठोर कारवाई

● मुंबई, विशाल कारंडे :




राज्यातील १० हजार ७७३ व्यापगत (लॅप्स) गृहप्रकल्प मार्गी लावण्यासाठी विकासकांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने अखेर आता ‘महारेरा’ने अशा प्रकल्पांविरोधात कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. या १० हजार ७७३ प्रकल्पांना ‘महारेरा’ने ‘कारणे दाखवा’ नोटीसा बजावली आहे. या नोटीसला संबंधित विकासकांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही तर ‘महारेरा’कडून प्रकल्पांची नोंदणी रद्द करणे वा स्थगिती करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पाचे बँक खातेही गोठवण्याची शक्यता आहे.

रेरा कायद्यानुसार राज्यातील गृहप्रकल्पांना ‘महारेरा’ नोंदणी बंधनकारक आहे. नोंदणी करताना विकासकांना प्रकल्प पूर्णत्वाची निश्चित तारीख नमुद करून त्या कालावधीत प्रकल्प पूर्ण करणे विकासकांना बंधनकारक असते. या कालावधीत प्रकल्प पूर्ण न झाल्यास आवश्यक ती कार्यवाही करून विकासकांना काही दिवसांची मुदतवाढ घेता येते. मोठ्या संख्येने विकासक प्रकल्प पूर्ण करत नसून मुदतवाढीची कार्यवाही करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांना व्यापगत (लॅप्स) प्रकल्प घोषित करून त्यांचे काम थांबवून घरविक्री बंद केली जाते. आतापर्यंत ‘महारेरा’ने अनेक प्रकल्पांना व्यापगत घोषित केले आहे. व्यापगत घोषित केल्यानंतरही मोठ्या संख्येने विकासक पुढील कोणतीही कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याचा फटका ग्राहकांना बसत आहे. ही बाब लक्षात घेत अखेर आता ‘महारेरा’ने १० हजार ७७३ प्रकल्पांना ‘कारणे दाखवा’ नोटीसा बजावल्या आहेत. २०१७ पासून नोंदणी झालेल्या प्रकल्पांचा यात समावेश आहे.

महारेराच्या नोटीशीनुसार प्रकल्प पूर्णत्वाचे काय? असा प्रश्न विचारण्यात आला आहे. प्रकल्प पूर्णत्वाविषयी आपण कोणताही माहिती महारेराकडे नोंदवलेली नाही. याची गंभीर दखल घेत कारणे दाखवा नोटीसा बजावल्याचेही नोटीशीत म्हटले आहे. पान २ वर

# मेट्रो ४ मार्गिकांवरील आव्हानात्मक कामात एमएमआरडीएला मोठे यश



## कापूरबावडी येथे चार तुळई बसविण्यात आले

● मुंबई, राकेश गायकवाड :

‘वडाळा – ठाणे – कासारवडवली मेट्रो ४’ आणि ‘कासारवडवली – गायमूख मेट्रो ४ अ’ मार्गिकांवरील एक आव्हानात्मक आणि अवघड काम पूर्ण करण्यात नुकतेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला यश आले. ‘मेट्रो ४’ आणि ‘मेट्रो ४ अ’ मार्गिकांवरील कापूरबावडी आंतरबदल स्थानकाच्या कामाअंतर्गत चार तुळई (यु गर्डस) यशस्वीपणे बसविण्यात आल्या. प्रत्येक १०० टन वजनाच्या या चार तुळई बसविण्यासाठी आठ तास लागले. ‘एमएमआरडीए’ने ‘मेट्रो ४’ आणि ‘मेट्रो ४ अ’चे काम हाती घेतले आहे. ‘मेट्रो ४’ मार्गिका टप्प्याटप्प्याने वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे. त्यानुसार नुकतेच या मार्गिकेतील अत्यंत अवघड आणि आव्हानात्मक काम ‘एमएमआरडीए’ने पूर्ण केले. ‘एमएमआरडीए’ने १४ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजता कापुरबावडी आंतरबदल स्थानकाच्या कामाअंतर्गत पहिल्या ४ तुळई बसविण्यास सुरुवात केली. हे काम पहाटेपर्यंत सुरू होते. हे काम पूर्ण होण्यास तब्बल आठ तास लागले. पान २ वर

## संपादकीय

# ‘किल्ले दुर्गाडी’च्या एका प्रतिवादीचे मनोगत

कल्याणमध्ये इतिहासप्रेमी मंडळ होते. त्यांच्या बैठका मॉर्डन व्ही स्कूल येथे होत. या बैठकांमध्ये इतिहासतज्ज्ञ कै. विवेकानंद गोडबोले मार्गदर्शन करीत. त्यांनी ‘कल्याण सुभे’ हे पुस्तकदेखील लिहिले होते. या पुस्तकात कल्याणचा इतिहास गोडबोले यांनी विशद केला आहे. ते सांगतात, “ब्रिटिशांनी आपल्यावर राज्य केले. त्यांनी ‘गॅजेट’ लिहिली. पण, त्यात अशी चूक करून

## लोकरक्षणाय

# डोंबिवलीत
# इमारती महाप

डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) : मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरून कारवाईच्या प्रतीक्षेत असलेल्या



# तबलावाद

जगविख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांन अत्यवस्थ वाटत असल्यानं अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोमधील रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी

जाकिर हुसैन यांना
२००२ मध्ये 'पद्मभू
'पद्मविभूषण' पुरस्का
आलं होतं. २००९ म
पुरस्कारानं गौरवण्या
प्रख्यात तबलावाद

## लोकरक्षणाय

# एमएसपी दराने धान



**रामटेक (नितीन देवळेकर) :** शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) दराने धानाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना नोंदणी करणे अनिवार्य आहे. पूर्वी या नोंदणीसाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदत ठरविण्यात आली होती.

# येत्या दोन दिवस

● नागपूर, नितीन देवळेकर :

"हिवाळी अधिवेशनातून महाराष्ट्राच्या जनतेला उब आणि ऊर्जा मिळेल असा कारभार करण्याचा प्रयत्न आम्ही करू. राज्य मंत्रिमंडळ विस्तारात आमच्या ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली असून त्यात

## महाराष्

